# CELEBRATING 14-JAN- 2013 GEOGRAPHY DAY

Presented by
Dr. Smita Rane

# VERY HAPPY THING TO KOLHAPURI PEOPLE

## 'पर्यावरण समृद्धी'त कोल्हापूर जिल्हा 'नंबर वन'

### ३३ कोटींचा निधी मिळणार : सर्वच्या सर्व ९२० ग्रामपंचायती योजनेसाठी पात्र

**सकाळ विशेष**

निवास चौगले : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : पर्यावरण समृद्धी, ग्रामसमृद्धी योजनेत कोल्हापूर जिल्ह्यातून प्रस्ताव पाठवलेल्या सर्वच्या सर्व ९२० ग्रामपंचायती पात्र ठरल्या आहेत. राज्यातील इतर जिल्ह्यांशी तुलना करता या योजनेतही कोल्हापूर 'नंबर वन' ठरले आहे. या पात्र ग्रामपंचायतींसाठी सुमारे ३३ कोटींचा निधी प्राप्त होणार आहे.

'सुधारणा स्वीकारा, कृती करा, निधी मिळवा आणि पुढे जा'.. या भावनेतून ग्रामपंचायतींना विकासकामासाठी थेट निधी उपलब्ध करून देण्याचा स्तुत्य उपक्रम या अभियानातून सुरू करण्यात आला आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक साधनांचा विकास करणे व त्यासाठी लोकसहभाग मिळवणे, पर्यावरणाचे भान ठेवून भौतिक सुविधा उपलब्ध करणे व समृद्ध ग्राम निर्माण करणे, मोठ्या ग्रामपंचायतींचा पर्यावरण विकास आराखडा व ग्रामविकास आराखडा तयार करून अशा मोठ्या गावांत शहरांच्या तोडीच्या सुविधा निर्माण करून

पान ९ वर »

### दरवर्षी मिळणाऱ्या बक्षिसांचे निकष..

दहा हजारांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायतींना दरवर्षी १२ लाख, ७ हजार ते १० हजार लोकसंख्या असलेल्या गावांना दरवर्षी ८ लाख, ५ ते ७ हजार लोकसंख्या असलेल्या गावांना पाच लाख, पाच हजारांपेक्षा कमी लोकसंख्येच्या गावांना प्रत्येकी चार लाख, तर १ हजारपर्यंत लोकसंख्या असलेल्या गावांना दोन लाख रुपयांचे बक्षीस मिळणार आहे.

# THE GREAT KING OF KOLHAPUR RAJARSHRI SHAHU MAHARAJ



# THIS PICTURE TOLD US STORY ABOUT THE KING




# KOLHAPUR HISTORICAL PLACE BHAVANI MANDAP



# KOLHAPUR IS THE FAMOUS 4 THE FOREST ALSO





# WE HAVE MANY TYPE OF ANIMALS





# WE HAVE MANY TYPE OF ANIMALS





# TIGERS ARE ALSO LIVED IN AMBOLI FOREST



**झळा लागल्या जीवा...** हैदराबाद : उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत आहे. अंगाची अक्षरशः काहिली होत आहे. तुम्ही-आम्ही आपण गारव्यासाठी काही ना काही प्रयत्न करतोच. प्राण्यांचे मात्र हाल-हाल होतात. या मुक्या प्राण्यांचे हाल कमी करण्याचा प्रयत्न येथील नेहरू पार्कमध्ये करण्यात येत असून उद्यानात बनविलेल्या कृत्रिम तळ्यात मंगळवारी वाघाच्या जोडीने पाण्यात डुंबून झळा कमी करण्याचा प्रयत्न केला.


# WATERFALL IN KOLHAPUR





हिरव्यागार वनराईने नटलेल्या आंबोली कावळेसाद पॉईंटवरून बेलागपणे दरीमध्ये झेपावणारा जलप्रपात आणि भोवतीचे सौंदर्य छायांकित केले आहे ऋतुराज देसाई याने.

# THE OLD KOLHAPUR IS VERY HELPFUL 4 THE NATURE




MISCELLANY

# HAPPY VILLAGES

"The true India is to be found not in its few cities, but in its seven hundred thousand villages. If the villages perish, India will perish too," declared Mahatma Gandhi. For him, the spirit and soul of India lives in her village communities. He dreamt of a free India where every village community is self-sufficient with its own carpenters, shoemakers, potters, builders, farmers, engineers, teachers, bankers and merchants. In short, he visualised each village to be a microcosm of India and strongly endorsed the status of "village republics" for the nation's villages. He observed that self-sufficient villages and its people is the way to comprehensive peace — peace with oneself, peace between people; and peace with nature. And this statement holds good even to this day. Unfortunately, the Indian village scenario does not depict a rosy picture.

Today, over 72 percent of the Indian population lives in some 6,38,000 villages and the rest 28 percent in about 5,480 towns and urban agglomerations. Indian villages are flooded with various issues such as poverty, unemployment and poor infrastructure. No development effort is complete without a comprehensive coverage of the "real India." The need of the hour therefore is rural developmental strategies focusing on poverty alleviation, better livelihood opportunities and provision of basic amenities and infrastructure facilities. Understanding the need to develop villages, Sri Siddhanta Foundation, an NGO from Chennai focuses on reaching out to the rural populace with innovative programmes to enhance the

# THE KOLHAPUR IS VERY FAST DEVELOPING CITY



BUT

# GLOBAL WARMING

**Global Warming is the increase of Earth's average surface temperature due to effect of greenhouse gases, such as carbon dioxide emissions from burning fossil fuels or from deforestation, which trap heat that would otherwise escape from Earth.**


THE CITY IS GOING TO CHANGE
UNDER DEVOLPMENT
MANY FACILITIES ARE HERE
BUT
SAME TIME INVITING

# POLLUTION

# RAIN ALSO NOT COMING ON TIME

## लहरी निसर्गराजा...





तेजपूर (आसाम), अहमदाबाद : निसर्गराजा लहरी असतो, असे म्हणतात. त्याने याची प्रचितीही वारंवार दिली आहे. त्याचीच ही दोन बोलकी छायाचित्रे. १) आसाममध्ये अतिवृष्टीने पूरस्थिती गंभीर बनली आहे. अनेक लोक बेघर झाले आहेत. हेलिकॉप्टरच्या मदतीने लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात येत आहे. पूरस्थिती कशी हाताळायची, याचीच चिंता तेथील सरकारला लागून राहिली आहे. २) देशातील अनेक राज्यांत पावसाने ओढ दिल्याने दुष्काळाच्या संकटाने सारेच चिंताग्रस्त झाले आहेत. अहमदाबाद येथे रविवारी ब्राह्मण समाजाने वरुणदेवाला प्रसन्न करण्यासाठी 'पर्जन्य यज्ञ' केला. पाण्याने भरलेल्या आणि त्यात फुलांच्या पाकळ्या टाकलेल्या मोठ्या भांड्यात बसून त्यांनी हा यज्ञ केला.

# WE ARE CELEBRATING DIWALI BUT WE CANT SEE THE AIR & NOISE POLUTION



# WHAT ABOUT THIS



रस्त्यावर कचरा टाकल्यास

# कडक कारवाई होणार

## सर्व कचरा उठाव झाल्याशिवाय कर्मचाऱ्यांना रजा नाही

कोल्हापूर, दि. ५ (प्रतिनिधी)

- कचरा तपासणीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची पथके नियुक्त
- नागरिकांशी संपर्क साधून कचरा निर्मूलनाबाबत प्रबोधन
- रात्रीच्या वेळीही स्वच्छता करण्याबाबत नियोजन

"कचरा उठावाचे काम कर्मचारी करतात की नाही याची तपासणी करण्यासाठी मनपाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची पथके नियुक्त करण्यात येणार असून, अनियमितता आढळल्यास कारवाई केली जाणार आहे."

— संजय हेरवाडे, उपायुक्त

# WEL-COME TO POLLUTED RANKALA



# कचरा कमी करण्यावर भर

## जिल्हाधिकारी राजाराम माने यांची माहिती

**कोल्हापूर** | दि. ८ (प्रतिनिधी)

**शहरात** कचरा टाकण्यास जागा नसल्याने कचरा प्रश्न गंभीर बनत आहे. ओला व सुका कचऱ्याचे विभाजन करून नागरिकांनी रिकाम्या जागेत कचऱ्यापासून खत निर्माण करून ते झाडांना वापरावे. तसेच प्रभागवार कचऱ्यापासून खत निर्मिती करण्याची प्रक्रिया सुरु करून शहरातील २० टक्के कचरा कमी करण्याची योजना महापालिकेने आखल्याची माहिती जिल्हाधिकारी राजाराम माने यांनी दिली. या उपक्रमासाठी महापालिका कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण व यंत्रसामग्री पुरविली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

महापालिकेने शहरात शून्य टक्के कचरा करण्याचे योजना आखली आहे. यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शून्य कचरा नियोजनासाठी आढावा बैठकीचे आयोजन महापालिकेत करण्यात आले होते. यासाठी महापौर सौ. कादंबरी कवाळे, उपायुक्त संजय हेरवाडे, उपायुक्त अश्विनी वाघमळे, उपमहापौर दिगंबर फराकटे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते. या कचरा नियोजनाची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

जिल्हाधिकारी माने म्हणाले, पुणे, पिंपरी-चिंचवाड शहराच्या धर्तीवर कचरा कमी करण्यासाठी नागरिक तसेच व्यावसायिकांमध्ये जागृती केली जाणार आहे. गेल्या काही वर्षापूर्वी कचरा टाकण्याचे नियोजन न केल्यानेच आज शहरातील कचरा प्रश्न गंभीर बनला आहे. टाकाळा खण येथे कचरा व इनर्ट मटेरिअल शास्त्रीय पद्धतीने टाकून कचरा टाकण्यासाठी जागा उपलब्ध करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. घरातील ओल्या कचऱ्यापासून घरीच खत निर्मिती करून ते खत झाडांना वापरता येणे शक्य आहे. तसेच



**महापालिका**

शहरातील काही जागांवर छोटे खत निर्मितीचे प्रकल्प उभारून कचरा मुरवता येईल. यासाठी महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना आवश्यक सामग्री तसेच प्रशिक्षण दिले जाणार आहे. याकामी व्यापक जनजागृती मोहीम सुरु करण्यात येणार असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

### जिल्हाधिकारी म्हणाले,

- 'झूम'मधील इनर्ट मटेरियल हलविणार
- टाकाळा खण येथे कचरा टाकण्याचे नियोजन
- प्लास्टिक कमी करण्यासाठी उपाययोजना
- कर्मचाऱ्यांना कचरा उठावाचे प्रशिक्षण
- अत्याधुनिक उपकरणे पुरवणार
- रिकाम्या जागांचा खत निर्मितीसाठी उपयोग
- नागरिक तसेच व्यावसायिकांमध्ये जागृती
- वर्षभर उपक्रम चालविणार
- शाळा-कॉलेजांतून जनजागृती मोहीम
- २० टक्के कचरा कमी करण्याचे उद्दिष्ट
- यासाठी १ कोटींच्या निधीची उपलब्धता



# HOW WE CAN STOP THIS



# झूम प्रकल्पाच्या जागेत आढळली मृत जनावरे

## प्रशासनाकडून पाहणी : प्रकल्पाची स्थिती वाईट

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : झूम प्रकल्पाच्या जागेत मृत जनावरेही आढळून आल्याने प्रदूषण नियंत्रण मंडळ, महापालिका अधिकारी आणि प्रजासत्ताक सामाजिक संघटनेने या प्रकल्पाची संयुक्त पाहणी केली. यावेळी या प्रकल्पाची स्थिती अत्यंत वाईट असल्याचे दिसून आले. कुजलेला कचरा, दुर्गंधी, भटक्या कुत्र्यांचा येथील वावर वाढला असल्याने या प्रकल्पाच्या ठिकाणी गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याचे पंचनाम्यात नमूद केले आहे. कुजलेल्या कचऱ्यामुळे निर्माण होणारे लिचेड कोठूनही बाहेर पडताना निदर्शनास आले असून हे मानवी आरोग्याच्या दृष्टीने घातक आहे.

प्रकल्पाच्या ठिकाणी कचऱ्याचा मोठा ढीग जमला आहे. संरक्षक भिंत नाही. प्रकल्पाची पाहणी करायलाही अधिकाऱ्यांना रस्ता नव्हता. प्रकल्पाच्या ठिकाणी भटकी कुत्री, घारी, अन्य जनावरे असल्याचे दिसून आले. त्यांच्या बंदोबस्तासाठी कोणत्याही प्रकारची व्यवस्था नसल्याचे येथे आढळले.

यावेळी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रीय अधिकारी रविराज पाटील, महापालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक विजय पाटील, आरोग्य निरीक्षक राजेंद्र पाटील, दिलीप देसाई, स्थानिक रहिवासी सुनील जाधव यांच्यासह अन्य अधिकारी, भागातील नागरिकही उपस्थित होते.

कोल्हापूर : झूम प्रकल्पाच्या ठिकाणी मेलेली जनावरे आढळून आली आहे. (नितीन जाधव : सकाळ वृत्तसेवा)

# WE NEED THE ACTION

## पंचगंगा लवकरच प्रदूषणमुक्त



कोल्हापूर : सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर जयंती नाल्यातून फेसाळत थेट पंचगंगेत मिसळणाऱ्या पाण्याचे असे चित्र काही दिवसांनी दिसणार नाही.

पान १ वरून

हैदराबाद येथील विश्व इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला या योजनेचे काम दिले आहे. सध्या या योजनेचे चाळीस टक्के काम पूर्ण झाले आहे. जानेवारी २०१३ मध्ये प्रत्यक्ष सांडपाण्यावर प्रक्रिया होईल, असे महापालिकेचे प्रकल्प अभियंता राजेंद्र ताडे यांनी 'सकाळ'ला सांगितले.

**नाल्याचे पाणी एकत्रित अडविणार**

पंचगंगा नदीत दूषित पाणी सोडणाऱ्या शहरातील जयंती, दुधाळी, बापट कॅम्प आणि लाईनबाजार या नाल्यांचे पाणी अडविण्यासाठी चारही नाल्यांवर बंधारे बांधण्यात येणार आहेत. जयंती नाल्यावर शहाजी कॉलेजमागे एक कोटी रुपये खर्चून बंधारा बांधण्यात आला आहे. या बंधाऱ्यामुळे पूर्वीच्या तुलनेत अधिक पटीने सांडपाणी साठवले जाणार आहे. ते विद्युत पंपाद्वारे उपसून कसबा बावडा येथील सांडपाणी प्रक्रिया केंद्रात सोडले जाणार आहे. सध्या दुधाळी नाल्यातील पाणीही उपसून जयंती नाल्यात सोडले जात आहे. जयंती नाल्यातील ६० एमएलडी पाणी सांडपाणी प्रक्रिया केंद्रात सोडले जाते. त्यासाठी जयंती नाला ते कसबा बावडा येथील सांडपाणी केंद्र अशी बारा कोटी रुपयांची स्वतंत्र पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे.

**दुधाळी नाल्यावर स्वतंत्र सांडपाणी प्रक्रिया केंद्र**

दुधाळी नाल्यातून पंचगंगा नदीमध्ये १७ एमएलडी पाणी मिसळते. या पाण्यावर सध्या कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. यापैकी दहा एमएलडी पाणी जयंती नाल्यात उपसा करून सोडले आहे; पण उर्वरित पाणी थेट नदीत मिसळते. या नाल्यावरही बंधारा बांधण्याचे काम प्रस्तावित आहे. राज्य शासनाच्या सुवर्णजयंती नगरोत्थान योजनेतून सुमारे २६ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. नाल्याच्या ठिकाणीच या निधीतून स्वतंत्र सांडपाणी प्रक्रिया केंद्र बांधले जाणार आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी निविदा तयार करणे आणि सल्लागार नियुक्त करण्याचे काम प्रतिपथावर आहे.

**थेट पाईपलाईनचा प्रश्न निधीच्या चर्चेत**

शहराला होणाऱ्या दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्यानंतर थेट पाईपलाईनचा पर्याय पुढे आला. थेट पाईपलाईनसाठी आंदोलने सुरू झाली. चार दशके हा लढा सुरू होता. प्रत्येकवेळी योजनेला तत्त्वतः मान्यता देण्यात आली; पण पुढे काहीच झाले नाही. त्यामुळे या योजनेचा खर्च ४० कोटींवरून आज ४०० कोटींवर गेला आहे. यावर्षी मात्र थेट पाईपलाईनची मागणी केवळ मान्यच झाली नाही, तर त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूदही करण्यात आली. या योजनेचे सर्वेक्षण करून आराखडा तयार करण्याच्या सूचना महापालिकेला देण्यात आल्या. त्यानुसार एका कंपनीकडून आराखडा तयार करून पाठविण्यात आला. यात अनेक त्रुटी असल्याने तो परत पाठविला. त्यामध्ये सुधारणा करून फेरप्रस्ताव सादर करण्यात आला आहे. योजना मंजूर करताना योजनेचा निम्मा खर्च महापालिकेला भरावा, अशी अट घालण्यात आली होती.

ही रक्कम मोठी असल्याने महापालिकेच्या वाट्याची रक्कम कमी करावी, अशी मागणी करण्यात आली. त्यानुसार ३० टक्के रक्कम महापालिकेने भरावी, असे सांगण्यात आले. ही रक्कमदेखील महापालिकेच्या आवाक्याबाहेरची असल्याने ९० टक्के रक्कम शासनाने द्यावी व १० टक्के रक्कम महापालिका भरेल, असा प्रस्ताव दिला आहे. याबाबत चर्चा सुरू आहे. ९० : १० हा प्रस्ताव शासनाने मान्य केल्यानंतर या योजनेच्या कामास सुरवात होईल.

### असे होते प्रदूषण

- शहरातील सर्व सांडपाणी जयंती, दुधाळी, बापट कॅम्प आणि लाईन बाजार या चार नाल्यांमधून वाहते. तेच पुढे पंचगंगेमध्ये मिसळते.
- जयंती नाला : ६० एमएलडी
- दुधाळी नाला : १७ एमएलडी
- बापट कॅम्प नाला : १० एमएलडी
- लाईन बाजार नाला : ५ एमएलडी
- नदीत मिसळणारे एकूण सांडपाणी : ९२ एमएलडी

# कचऱ्याची दुर्गंधी विद्यार्थ्यांच्या जीवावर

## उपनगरांत कचरा उठावाची समस्या गंभीर : आरोग्य विभागाचे गांधारीचे सोंग, नगरसेवकांचे दुर्लक्ष

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ८ : शाळांच्या परिसरातील कचऱ्याची दुर्गंधी, उपनगरांतील कचरा उठावाचा प्रश्न, उघड्यावरील कोंडाळे शालेय मुलांचा जीव धोक्यात आणत आहे. परिणामी खासगी दवाखान्यांत रुग्णांच्या रांगा लागत आहेत. यात ऊन-पाऊस असे वातावरण अधिक भर घालत आहे. तरीही आरोग्य यंत्रणेने गांधारीचे सोंग घेतले आहे. औषध आणि धूर फवारणी, डी.डी.टी. इत्यादीं फेकलेच नाही. काही स्थानिक नगरसेवक प्रभागात फिरकतच नसल्यामुळे त्यांना या समस्येचा अंदाजही येत नाही. त्यामुळे कचऱ्याची दुर्गंधी विद्यार्थ्यांच्या आरोग्याला घातक ठरत आहे.

उपनगरांतील शाळांच्या परिसरात आज कचऱ्याचे ढीग लागले आहेत.

आठ-आठ दिवस कचरा उठाव होत नसल्याचा स्थानिक नागरिकांचा अनुभव आहे. जवाहरनगर हायस्कूल आणि वीर कक्कय विद्यालयाच्या परिसरातील सुमारे शंभर कुटुंबीयांचा कचरा याच परिसरातील कोंडाळ्यात रोज साठवला जातो. हा कोंडाळा बंदिस्त नसल्यामुळे तेथील कचरा रस्त्यावर, मैदानावर पसरला जात आहे. त्याचा उठाव नियमित होत नसल्यामुळे त्याची दुर्गंधीही वाढली आहे. यात ऊन-पाऊस असे वातावरण असल्यामुळे या दुर्गंधीत अधिक भर पडली आहे. या भागातील अनेक विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी पायात चप्पलही मिळत नाही. अशा अनेक विद्यार्थ्यांना कचरा उठावाच्या अभावाचा त्रास सहन करावा लागत आहे. काही जण खासगी उपचार घेत आहेत. जवाहरनगरसह सुभाषनगर, मंगेशनगर, यशोनगर परिसर, राजेंद्रनगर, शास्त्रीनगर परिसर, बाय.पी.पोवारनगर परिसर, आझादनगर अशा अनेक ठिकाणच्या कोंडाळ्यांची हीच अवस्था आहे. यातच येथील रस्त्यांची दुरवस्था आहे. काही ठिकाणी ड्रेनेजचे काम सुरू आहे. त्यामुळे मुख्य रस्त्यावरही दलदल निर्माण झाली आहे. त्यामुळे डासांचे प्रमाण वाढले आहे. काही नगरसेवक स्वतः लक्ष घालून उपनगरातील स्वच्छता राखण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. तर काही नगरसेवकांनी कर्तव्यदक्षता न दाखविल्यामुळेच आज अनेक विद्यार्थ्यांचे, लहान मुलांचे आरोग्य धोक्यात येत आहे. आरोग्य विभागही तक्रार केल्यानंतरच काम 'दखलपात्र' करून घेतल्या मानतो.

उपनगरातील कचरा उठावाची समस्या जशी गंभीर आहे, त्याचप्रमाणे इंदुमती गर्ल्स हायस्कूलजवळील मुतारीमुळेही त्या परिसरात दुर्गंधी आणि दलदल निर्माण झाली आहे. तेथेही पाण्याचा निचरा होत नाही. या परिसरातही भक्ती सेवा विद्यापीठ मराठी शाळा, विद्यापीठ हायस्कूल, इंदुमती गर्ल्स हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची वर्दळ असते. तेथील विद्यार्थी केवळ आजारपणामुळे शाळेत गैरहजर राहत आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे तीन-तेरा वाजत असतानाही महापालिकेचे प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याची स्थिती आहे.



कोल्हापूर : जवाहर नगरातील वीर कक्कय विद्यालय आणि जवाहर हायस्कूल परिसरातील रस्त्यावर पसरलेला कचरा. येथे रोज चारशे विद्यार्थी दुर्गंधी घेतच शाळेत येतात. येथे कचरा उठावाचा आणि बंदिस्त कोंडाळ्याचा अभाव आहे. (नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

**वस्तुस्थिती :**

- कचरा उठाव नसल्यामुळे अनेक ठिकाणी दुर्गंधी
- शाळा-हायस्कूलच्या परिसरात कचरा रस्ता, मैदानावर
- अनेक विद्यार्थी आजारपणामुळे गैरहजर
- औषध फवारणी, धूर, डी.डी.टी. पावडर फवारणीचा अभाव
- उपनगरांत बंदिस्त कोंडाळ्यांची वानवा
- सांडपाणी निचऱ्याचा अभाव
- ड्रेनेजच्या कामामुळे दलदल, परिणामी डासांचा फैलाव

**उपाय :**

- तातडीने कचरा उठाव झाला पाहिजे
- धूर, औषध फवारणी दोन दिवसांतून एक वेळ आवश्यक
- विशेषतः शाळांचा परिसर स्वच्छ असणे आवश्यक
- स्वच्छतेबाबत नगरसेवकांनी स्वतः प्रशासनाकडे आग्रह धरला पाहिजे
- उपनगरात कोंडाळे नसलेल्या ठिकाणच्या कचऱ्याची विल्हेवाट तातडीने लावणे आवश्यक

# जलपर्णींच्या विळख्यात अडकला 'कोटीतीर्थ'

## तलावाला अवकळा आल्याने नागरिक संतप्त

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : ऐतिहासिक कोटीतीर्थ तलाव जलपर्णींच्या विळख्यात अडकला असून, महापौरांच्या प्रभागात असलेला हा तलाव जलपर्णीमुक्त केव्हा, अशी विचारणा स्थानिक नागरिकांतून होत आहे.

रंकाळा तलावाच्या धर्तीवर कोटीतीर्थवर महापालिकेने मोहीम राबवून तलावाला श्वासमुक्त करावे, अशी स्थानिकांची मागणी आहे. करवीर महात्म्यात उल्लेख असलेला कोटीतीर्थ तलाव जलपर्णींच्या विळख्यात सापडला आहे. सातत्याने तक्रारी करूनही महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे. महापौरांच्या प्रभागात तलावाचा समावेश होत असूनही संबंधित यंत्रणेचे होत असलेले दुर्लक्ष दुर्दैवी असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. ज्येष्ठ नागरिक संघटनेचे बापूसाहेब अथणे यांनी आयुक्तांना पूर्वीच निवेदन देऊन कोटीतीर्थ तलावाचा तीर्थक्षेत्र आराखड्यात समावेश करावा, अशी मागणी केली आहे. पन्नास ते साठ वर्षांपूर्वी ज्या तलावातील पाणी लोक पिण्यासाठी वापरत होते त्याच तलावाला आज अवकळा प्राप्त झाली आहे.



कोल्हापूर : अं हं, हे ऑलिम्पिकचं मैदान नव्हे भावा! खुद्द महापौरांच्या प्रभागातील हे आपलं कोटीतीर्थ आहे...! दोन मंदिरांच्यामधील हे प्राचीन तीर्थ त्याच्याकडं महापालिका प्रशासन कधी लक्ष देणार? (संजय देसाई : सकाळ छायाचित्रसेवा)

...अविकदारा असल्याने ...असला तरी ती झटकता येणार नाही. केवळ कोल्हापूर महानगरपालिका व इचलकरंजी नगरपालिका यांच्यावर फौजदारी करून हा प्रश्न सुटणारा नाही हे शासनालाही माहीत आहे, मग कारवाई करण्याचा आग्रह कशासाठी? विधिमंडळ अधिवेशन सुरू आहे म्हणून दुसऱ्याला कारणीभूत ठरवणे म्हणजे आपले दोष आणि नाकर्तेपणा लपविण्याचा प्रकार आहे. फौजदारीचे आदेश देण्यापेक्षा प्रदूषण मुक्तीसाठी पुरेसा निधी दिला असता तर त्यातून काही तरी निष्पन्न झाले असते. फौजदारी केल्याने हा प्रश्न निकाली निघेल असा कोणाचा समज असेल तर तो अत्यंत चुकीचा होईल.

**- भारत चव्हाण**

## नादखुळा

- अमिताभ कुमार




हालवा!

### हिरण्यकेशीच्या काठी कचरा, सुया, सिरिंज : विरोधकांचा आरोप; फौजदारीची मागणी

# 'गडहिंग्लज'मध्येही जिवाशी खेळ !

**गडहिंग्लज** | दि. १२ (प्रतिनिधी)

**हिरण्यकेशी** नदीकाठावर घनकचऱ्यासह जैवकचरा आणि रिलायन्स पेट्रोल पंपानजीकच्या ओढ्यालगत टाकण्यात आलेल्या कचऱ्यामुळे शहरासह पूर्वभागातील जनतेच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे पालिका पदाधिकारी व मुख्याधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी विरोधी आघाडीतर्फे जिल्हाधिकारी व प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे निवेदनातून करण्यात आली आहे.

गडहिंग्लज शहरानजीक हिरण्यकेशीच्या नदीकाठावर रिंगणेंच्या शेतानजीक आणि रिलायन्स पेट्रोल पंपासमोरील पोवारांच्या शेतानजीक पालिकेने मोठ्या प्रमाणात कचरा टाकला आहे. कचऱ्यात सुया व सिरिंजसह जैवकचरादेखील असून, हा कचरा नदीच्या पाण्यात मिसळत आहे. महापुराच्या पाण्यामुळे हा कचरा पुन्हा नदीच्या पाण्यात मिसळून मोठ्या प्रमाणात पाण्याचे प्रदूषण होणार आहे.

डेपोतील कचऱ्याची विल्हेवाट शहर हद्दीत करू नये, अशी सूचना गेल्या महिन्यातील पालिकेच्या सर्वसाधारण सभेत केली होती. त्याबद्दल प्रांतांकडे लेखी तक्रारही केली होती. तरीदेखील बेजबाबदारपणे चुकीच्या ठिकाणी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे. जिल्ह्यात काविळीच्या साथीचे थैमान सुरू असतानाही नागरिकांच्या जिवाशी खेळ चालला आहे. गडहिंग्लज तालुक्यात काविळीचे ४३ रुग्ण आढळले आहेत. दूषित पाण्यामुळे जरळी, दुंडगे, मुगळी, नीलजी, नांगनूर, नूल, कडलगे व अरळगुंडी गावांतील नागरिकांच्या आरोग्याला धोका पोहोचणार आहे, अशी तक्रार करण्यात आली आहे.

शिष्टमंडळात विरोधी पक्षनेत्या प्रा. स्वाती कोरी, नगरसेवक दादू पाटील, रामेश कोरवी, बसवराज खणगावे, बाळासाहेब वडर, नितीन देसाई, उदय पाटील, सौ. सरिता भैसकर यांचा समावेश होता.

**महसूल खात्याकडून पंचनामा**

प्रांताधिकारी नीलिमा धायगुडे व तहसीलदार अनिल कारंडे यांनी तक्रारीची गंभीर दखल घेतली. मंडल अधिकारी अशोक कोळी व तलाठी बी. के. मगदूम यांनी दुपारी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.



गडहिंग्लज येथे हिरण्यकेशी नदीकाठावर टाकण्यात आलेला घनकचरा. इन्सेटमध्ये सुया, सिरिंज, आदी.

### शेतकऱ्यांच्या मागणीवरून कचरा टाकला

शेतकरी पोवार यांच्या मागणीवरून संकेश्वर रोडनजीक ओढ्यापासून १० ते १५ मीटर अंतरावर माती टाकली आहे. नदीपात्रातील कचरा घाटानजीक बाहेर काढून टाकला आहे. या कचऱ्यामुळे कोणतेही प्रदूषण झालेले नाही.

**- रामदास कुराडे,**
उपनगराध्यक्ष
गडहिंग्लज.

### प्रदूषण झालेले नाही

कोणत्याही प्रकारचे प्रदूषण होणार नाही याची दक्षता पालिका नेहमीच घेते. संबंधित शेतकऱ्यांच्या संमतीनेच व मागणीवरून कचरा टाकण्यात आला आहे. कचऱ्यामुळे कोणतेही प्रदूषण झालेले नाही.

**- राजेंद्र तेली,**
मुख्याधिकारी न. प. गडहिंग्लज

### कारवाई न झाल्यास जनआंदोलन

प्रांतांकडे केलेल्या तक्रारीनुसार कचऱ्याचा पंचनामा झाला आहे. जिल्हाधिकारी व प्रदूषण नियंत्रण मंडळाकडेही तक्रार केली आहे. संबंधितांवर कारवाई न झाल्यास जनआंदोलन छेडण्यात येईल.

**- प्रा. स्वाती कोरी**
विरोधी पक्षनेत्या न. प. गडहिंग्लज

# शहरातील कचऱ्याचा प्रश्न गंभीर

## झूम प्रकल्पात दोन लाख टन कचरा; पालिकेच्या निविदेला प्रतिसाद नाही

**सकाळ वृत्तसेवा**



### कचरा टाकणार कुठे?

शहरातील कचरा टाकायला जागा नाही. कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प नाही. एखादा प्रकल्प स्वतः सुरू करावा म्हटले तर महापालिकेकडे फंड नाही, अशा विचित्र कात्रीत शहरातील कचऱ्याचा प्रश्न अडकला आहे. त्यामुळेच महापालिकेने खासगीकरणातून हा प्रकल्प उभा करण्याचे नियोजन केले आहे; पण यालाही प्रतिसाद मिळालेला नाही.

कोल्हापूर, ता. १४ : शहरातील कचऱ्याचा प्रश्न गंभीरच बनत चालला आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पासाठी महापालिकेने काढलेल्या निविदेला कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याने आता पुन्हा निविदा काढण्याची वेळ महापालिकेवर आली आहे. दरम्यान, झूम प्रकल्पाच्या ठिकाणी कचऱ्याचा मोठा ढीग साचला आहे. सुमारे दोन लाख टन कचरा येथे कुजत आहे.

कोल्हापूर शहरातील कचऱ्याचा प्रश्न सोडविणे आता महापालिकेसमोर आव्हानच आहे. विशेष म्हणजे कचऱ्यापासून खताची निर्मिती करणारा झूम प्रकल्प बंद पडल्यापासून हा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. त्यातच कचरा टाकायलाही महापालिकेकडे जागा नाही. त्यामुळे झूम प्रकल्पाच्या ठिकाणीच कचरा कुजत आहे. कचऱ्यावर विविध प्रकारची प्रक्रिया करून शहरातील घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेने निविदा टेंडर प्रसिद्ध केले होते. हे टेंडर भरण्याची मुदत ३ ऑक्टोबरपर्यंत होती. सहा कंपन्यांनी फॉर्म नेले होते. पण एकाही कंपनीने टेंडर भरलेले नाही. त्यामुळे हे टेंडर पुन्हा प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

कचऱ्यापासून खतनिर्मिती, वीजनिर्मिती असे अनेक पर्याय आहेत. पण महापालिकेकडे निधी नसल्याने खासगी उद्योजकांच्या मदतीने महापालिका हा प्रकल्प राबविणार आहे. त्यासाठीच महापालिकेने निविदा प्रसिद्ध केल्या होत्या. पण या निविदेमध्ये काही अटी जाचक स्वरूपाच्या आहेत. जी कंपनी आपला प्रकल्प सुरू करेल, त्या कंपनीला महापालिकेलाही काही रक्कम शेअर स्वरूपात द्यावी लागणार आहे. तसेच संबधित कंपनीनेच प्रकल्पासाठी गुंतवणूक करायची आहे. या निविदेतील काही अटी जाचक असल्याने टेंडरला प्रतिसाद मिळाला नसल्याचे सांगण्यात येत आहे.

यासंदर्भात महापालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक विजय पाटील म्हणाले, पहिल्यांदाच निविदा काढल्या होत्या. त्याला योग्य प्रतिसाद मिळाला नसल्याने पुन्हा निविदा काढण्यात येणार आहेत. दरम्यान, गेल्या वर्षभरापेक्षाही अधिक काळापासून झूम प्रकल्पावर साचून राहिलेला कचरा कुजत आहेत. कचरा टाकायला जागा नाही. सुमारे दोन लाख टनाहून अधिक कचरा एकाच ठिकाणी कुजत आहेत. त्यामध्ये दररोज १६० टन कचऱ्याची भर पडत चालली आहे.



जलपर्णी काढण्यासाठी नदीपात्रात उतरलेला नागरिक.

# पंचगंगेचा श्वास मोकळा होतोय

» पान १ वरून

ढकलू लागले. मात्र मोठ्या प्रमाणात जलपर्णी वाढल्याने त्यालाही मर्यादा येत होत्या. पात्राच्या कडेला काढून टाकलेली जलपर्णी डंपरच्या साहाय्याने कचरा डेपो येथे हलविली. पालिकेच्या आरोग्य खात्यातील अनेक कर्मचारी या मोहिमेत सहभागी झाले होते. दुपारपर्यंत ही मोहीम चालली. दरम्यान, पालिकेने जलपर्णी काढण्याची मोहीम सुरू केली असली तरी त्याला प्रचंड मर्यादा आहेत. यांत्रिक पद्धतीने जलपर्णी काढण्याचा पर्याय आहे. मात्र सद्य:स्थितीत त्याची अंमलबजावणी होणे अशक्य आहे. येथील बंधाऱ्यातील जलपर्णी काढून टाकण्यात आली तरी गांधीनगरपर्यंत वाढलेली ही जलपर्णी पुन्हा याठिकाणी पाण्याच्या प्रवाहाबरोबर येणारच आहे. त्यामुळे ही मोहीम पालिकेच्या आवाक्याबाहेर आहे.

'ड्रॅग रेसेस' या खेळालाही हळूहळू गालबोट लागू लागले आहे. अपुरे ज्ञान आणि फाजील आत्मविश्वास असलेले बायकर्स अशा रेसेस सार्वजनिक वाहतुकीच्या रस्त्यांवर खेळू लागतात आणि त्यातूनच जीवघेणे अपघात होऊन बायकर्स किंवा बायकिंग या संकल्पनेला कालिमा फासतात. असे लोक ड्रॅग रेसिंगमागची कला आणि तंत्र याकडे न बघता केवळ एक जीवघेणा खेळ बनवून ठेवतात.



# PLEASE SAVE EARTH

# SAVE LIFE



# THANK YOU